जावक क्रमाक :२६६२/२०१८
भारती विद्यापीठ पोलीस ठाणे पुणे
दि.:२९/०५/२०१८

प्रति,
मा.जनसंपर्क अधिकारी सो,
पोलीस आयुक्तालय,पुणे शहर
यांना सविनय सादर

**प्रतिवेदक** :- आर.जी.घनवट, पोलीस हवा.ब.नं.८६३, भारती विद्यापीठ पो.स्टे.पुणे
यांज कडून विनंती पूर्वक की,

**विषय** :-मिसिंग व्यक्तीचा सर्व वर्तमान पत्राद्वारे तपास होणेबाबत.

---

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे मनुष्य मिसिंग रजि.क्र 55/२०१८ मधील खबर देणार इसम नामे अक्षय चंद्रकांत जाधव वय २२ वर्षे, रा.स.नं.१६ साईसिध्दी चौक , गणेश चेंबर्स सोसायटी फलॅट नं १५ आंबेगाव पठार पुणे ४११०४६ पुणे यांनी खबर दिल्यात मजकुर की, खबरदार यांची आई दि १९/०५/२०१८ रोजी सकाळी ०५.३० वा.ते ०६.०० वाचे सुमारास माझी आई राहते घरातून वेडाचे भरात कोणास काहीएक न सांगता निघून गेलेली आहे.आम्ही तिचा आमचे नातेवाईक, व राहते ठिकाणचे परिसरात शोध घेतला असता ती अदयापर्यंत मिळून आली नाही.म्हणून खबर देणार हे त्यांची आईची मिसिंग तक्रार देत आहे.मिसिंग व्यक्तीचे वर्णन खालीलप्रमाणे.



नावः- सौ कमल चंद्रकांत जाधव वय ४७ वर्षे,धंदाः-गृहीणी रा.सदर, शिक्षण १ ली, रंग सावळा, अंगाने जाड, उंची ५ फुट, केस काळे पांढरे,लांबसडक,डोळे काळे पांढरे,नाक बसके,नेसणीस अंगात चॉकलेटी रंगाची साडी व पांढरे रंगाचा ब्लावूज, मराठी भाषा बोलते,तोंडातील सर्व दात पडलेले व १ समोरील फक्त १ दात आहे.पायात चप्पल नाही,अंगावर कोणतीही चिजवस्तू नाही, जवळ २० ते ३० रुपये आहेत. थोडी वेडसर आहे.भारती हॉस्पिलट येथे औषधोपचार चालू आहेत.

येणप्रमाणे वरील वर्णनाची मिसिंग व्यक्ती दि.१९/०५/२०१८ रोजी पहाटे ०५.३० वा.ते ०६.०० वाजणेच्या सुमारास वेडाचे भरात राहाते घरातुन कोणास काहीएक न सांगता निघुन गेली आहे. अद्यापपर्यंत घरी आली नाही. तरी तीचा शोध व्हावा म्हणुन मिसींग तक्रार दाखल आहे.

येणे प्रमाणे वरील वर्णनाचे मिसिंग व्यक्तीचा शोध होणेकामी सर्व वर्तमानपत्रात माहीती प्रसिध्द होण्यास विनंती आहे.